ePaper
E20 पेट्रोलवरून आपचा मोर्चा; केजरीवाल यांना पोलिसांनी अडवले

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




तब्बल १५० कोटींची सायबर फसवणूक

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 05 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## लाल किल्ल्यासह अनेक ठिकाणी बॉम्बस्फोटाची धमकी, यंत्रणा सतर्क

# स्वातंत्र्यदिनापूर्वी दिल्लीत दहशत

**महाईन्यूज । नवी दिल्ली**


**स्वातंत्र्य दिनापूर्वी राजधानी दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्थेची तयारी सुरू असतानाच दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) महापौरांच्या कार्यालयाला एक धमकीचा ईमेल मिळाल्याने घबराट व दहशत पसरली. स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यासह दिल्लीतील अनेक प्रमुख ठिकाणी बॉम्बस्फोट घडवले जातील, असा दावा ईमेलमध्ये करण्यात आला आहे. ही धमकी मिळताच महापौरांच्या कार्यालयाने तात्काळ दिल्ली पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणांना माहिती दिली.**

दिल्लीत साजरा होणारा स्वातंत्र्यदिन सोहळा अवघ्या दहा-अकरा दिवसांवर आला असताना हल्ल्याचा इशारा मिळाल्याने सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी मिळताच पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांनी तपासाला गती दिली. खबरदारीचा उपाय म्हणून, महापौरांच्या कार्यालयाच्या परिसरातील सुरक्षा वाढवण्यात आली. या प्रकरणाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. पोलीस, सायबर टीमच्या मदतीने ईमेल पाठवणाऱ्याची ओळख पटवण्याचे आणि त्याच्या स्रोताचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

गेल्या महिन्याच्या सुरुवातीला दिल्ली पोलिसांच्या नियंत्रण कक्षात एक निनावी फोन आल्यानंतर मुंबई पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. पहाटे 2 वाजण्याच्या सुमारास आलेल्या या फोनमध्ये, एका अज्ञात व्यक्तीने त्या दिवशी मुंबईत बॉम्बस्फोट होईल असा दावा केला होता. ही माहिती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र आणि मुंबई पोलिसांना, राज्य यंत्रणांसह, सतर्क करण्यात आले. संपूर्ण शहरात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, धमकी दिल्यानंतर आरोपीचा मोबाईल फोन बंद करण्यात आला होता. त्यापूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पालाही बॉम्बची धमकी मिळाली होती.

### शाळांमध्येही बॉम्बस्फोटाचा इशारा

यापूर्वी, राजधानी दिल्लीतील अनेक शाळांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्यामुळे तात्काळ सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या होत्या. शाळा रिकाम्या करून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान सर्व मानक सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले आणि बॉम्बनिकामी पथक व स्थानिक कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी बाधित शाळांच्या परिसराची कसून तपासणी केल्याचे दिल्ली पोलिसांनी सांगितले.



# पुणेकरांचा प्रवास महागणार!

## रिक्षा भाडेवाढीला 'RTA'ची मंजुरी; लवकरच नवे दर होणार जाहीर

**महाईन्यूज । पुणे**

**महागाईच्या वाढत्या झळांमुळे त्रस्त असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना आता रिक्षा प्रवासासाठीही जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने (आरटीए) रिक्षा भाडेवाढीला मंजुरी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.**



> 'आरटीए'ची बैठक चांगली झाली. या बैठकीत पुण्यातील वाहतुकीसंदर्भात वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. भाडेवाढीचा निर्णय अद्याप जाहीर करण्यात आला नाही. लवकरच हा निर्णय जाहीर करण्यात येईल.
>
> - अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली 'आरटीए'ची बैठक झाली. या बैठकीत रिक्षाच्या भाडेवाढीबाबत चर्चा करण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) अद्याप भाडेवाढ जाहीर करण्यात आलेली नाही. येत्या दोन दिवसात नवीन भाडे दर जाहीर करणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितले.

पुण्यात पहिल्या १.५ किलोमीटर प्रवासातही २५ रुपये आणि त्यानंतर १७ रुपये प्रती किलोमीटर असा दर आकारण्यात येतो. आता मात्र नवीन दरानुसार हे भाडे वाढणार असल्याची शक्यता आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्षा संघटनांकडून भाडेवाढीची मागणी करण्यात येत होती. सीएनजीच्या किमतीत झालेली मोठी वाढ, वाहनांच्या सुट्या भागांचे वाढलेले दर, विमा, देखभाल आणि दुरुस्तीवरील वाढता खर्च तसेच सर्वसाधारण महागाईमुळे सध्याच्या भाडेदरात व्यवसाय करणे परवडत नसल्याचे संघटनांचे म्हणणे होते. या पार्श्वभूमीवर 'आरटीए'च्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

पुण्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत रिक्षांचा मोठा वाटा आहे. पुणे शहर आणि परिसरात साधारण दीड लाखांच्या आसपास रिक्षा धावतात. त्यामुळे दररोज लाखो प्रवासी रिक्षाने प्रवास करतात. रिक्षाच्या भाडेवाढीचा सर्वाधिक फटका दैनंदिन प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. शाळा, कॉलेज, कार्यालयात जाण्यासाठी रिक्षेचा वापर करणाऱ्यांचा मासिक खर्च वाढणार आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून कोणतीही भाडेवाढ न झाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या रिक्षाचालकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार असल्याचीही भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## साखरेचा भाव ५० पार! सणासुदीच्या तोंडावर सर्वसामान्यांना मोठा झटका

**महाईन्यूज । पुणे**

**साखरेच्या उत्पादनात झालेली घट, तसेच वाढत्या मागणीमुळे गेल्या महिन्याभरात साखरेच्या दरात किलोमागे सहा ते सात रुपयांची वाढ झाली आहे. सणासुदीच्या तोंडावर साखर महाग होणार असल्याने सामान्यांना दरवाढीची झळ पोहोचणार आहे. किरकोळ बाजारात एक किलो साखरेला ५२ ते ५३ रुपये भाव मिळाला आहे. सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.**



> बाजारात सध्या चांगल्या प्रतीची साखर उपलब्ध नाही. चांगल्या प्रतीच्या साखरेचे भाव जास्त आहेत. साखर हंगाम सुरू होण्यासाठी तीन महिने लागणार आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस नवीन हंगाम सुरू होईल. त्यानंतर साखरेचा भाव कमी होईल. आगामी सणासुदीच्या काळात साखरेचे दर तेजीत राहणार आहेत.
>
> - ईश्वर नहार, साखर व्यापारी, मार्केट यार्ड भुसार बाजार

> पाऊस लांबल्याने ऊस लागवडीवर परिणाम झाला. ऊस लागवडीस वेळ लागणार असल्याने साखर कारखाने उशिरा सुरू होण्याची शक्यता आहे. केंद्र शासनाने उपलब्ध असलेला साखरेचा साठा विचारात घेणे गरजेचे आहे. सणासुदीच्या काळात मागणीच्या तुलनेत साखरेची आवक कमी होणार असून, भावही तेजीत राहणार आहे. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात साखरेचे भाव कमी होण्याची शक्यता आहे.
>
> - मुकेश गोयल, साखर व्यापारी, मार्केट यार्ड, भुसार बाजार

केंद्र शासनाने ऑगस्ट महिन्याचा साखरेचा कोटा नुकताच जाहीर केला. साडेबावीस लाख टन एवढा कोटा ऑगस्ट महिन्यासाठी जाहीर करण्यात आला आहे. जुलै महिन्यात साखरेच्या दरात टप्प्याटप्प्याने वाढ होत गेली. साधारणपणे क्विंटलमागे ६०० रुपयांनी वाढ झाली. श्रावण मास, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, तसेच दिवाळीत साखरेच्या मागणीत वाढ होते. किरकोळ ग्राहकांसह मिठाई विक्रेत्यांकडून साखरेच्या मागणीत मोठी वाढ होते.

'गेल्या हंगामात साखर उत्पादनात घट झाली. घाऊक आणि किरकोळ बाजारातील मागणी विचारात घेता सध्या बाजारात होत असलेली साखरेची आवक अपुरी आहे. साखर कारखानदारांकडे साखरेचा साठा कमी आहे. व्यापारी साखरेची साठवणूक करू शकत नाहीत. तेवढी जागाही व्यापाऱ्यांकडे उपलब्ध नाही. मागणीच्या तुलनेत साखरेची आवक कमी होत असल्याने दरवाढ झाली आहे,' असे मार्केट यार्ड भुसार बाजारातील साखर व्यापारी, मोतीलाल अँड सन्स पेढीचे संचालक ईश्वर नहार यांनी नमूद केले.

मार्केट यार्डातील घाऊक बाजारात सोमवारी प्रतिक्विंटल साखरेला ४९०० ते ५१०० रुपये असा भाव मिळाला. घाऊक बाजारातील भाव तेजीत असल्याने किरकोळ बाजारातील दरवाढ अपरिहार्य आहे. किरकोळ बाजारात साखरेचा भाव ५२ ते ५३ रुपये किलो आहे, असे सांगण्यात आले.

# तब्बल १५० कोटींची सायबर फसवणूक

## देशभरातील ६५ जणांना ऑनलाइन गुंतवणूक फसवणुकीचा गंडा

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**देशातील विविध राज्यांतील ६५ नागरिकांना इन्व्हेस्टमेंट फ्रॉडसह विविध प्रकारच्या ऑनलाइन फसवणुकीत अडकवून तब्बल १५० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणातील टोळीशी संबंधित असल्याच्या आरोपावरून सचिन संजय काळे (वय २५, रा. गोडाऊन चौकाजवळ, मोशी, ता. हवेली, जि. पुणे) याला आळंदी पोलिसांनी अटक केली आहे.**



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत आळंदी पोलीस ठाण्यात स्थापन करण्यात आलेल्या सायबर सेलमार्फत 'म्युल अकाउंट' संदर्भात तपास सुरू होता. या तपासादरम्यान सचिन काळे याचे कॉसमॉस बँक, आळंदी येथील बचत खाते ऑनलाइन फसवणुकीतून मिळालेली रक्कम स्वीकारण्यासाठी वापरले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७४/२०२६ आणि २८३/२०२६ अन्वये बीएनएसच्या विविध कलमांखाली दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांच्या तपासानुसार, आरोपीने स्वतःच्या नावावर विविध बँकांमध्ये एकूण ९ बँक खाती उघडली होती. सायबर फसवणुकीतून आलेली रक्कम या खात्यांवर स्वीकारून ती एटीएम तसेच चेकच्या माध्यमातून काढण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.

विशेष म्हणजे, NCRP पोर्टलवरील उपलब्ध माहितीनुसार देशातील विविध राज्यांतील एकूण ६५ नागरिकांची सुमारे १५० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. त्यापैकी सचिन काळे याच्या विविध तीन बँक खात्यांमध्ये सुमारे १ कोटी १५ लाख रुपये जमा झाल्याचे तपासात आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी काळे याला अटक केली असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध आणि पुढील आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त शशीकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आव्हाड, अपर पोलीस आयुक्त प्रादेशिक विभाग बसवराज तेली, पोलीस उपायुक्त मारुती जगताप आणि सहाय्यक पोलीस आयुक्त योगेश रांजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. नरके, उपनिरीक्षक तुकाराम खडके, महिला पोलीस हवालदार आरती निकम, पोलीस शिपाई सोळंके आणि जगताप यांच्या पथकाने केली.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

आपल्या नावावरील बँक खाते किंवा सिमकार्ड कोणत्याही अनोळखी व्यक्तीला वापरण्यास देऊ नये. तसेच अनोळखी व्यक्तीकडून ऑनलाइन पैसे स्वीकारून ते एटीएम किंवा चेकद्वारे रोख स्वरूपात काढून देऊ नयेत. अशी रक्कम ऑनलाइन फसवणुकीतून आलेली असण्याची शक्यता असून संबंधित बँक खाते 'म्युल अकाउंट' म्हणून वापरले जाऊ शकते, असा इशारा पोलिसांनी दिल.

# वाकड प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा; आठवलेंची मागणी

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**वाकड येथील दहा वर्षीय चिमुकलीवरील अत्याचाराची घटना माणुसकीला कलंक लावणारी आहे. या गुन्ह्यातील आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. हा खटला जलद गती न्यायालयात चालविण्यात यावा, अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मंगळवारी केली.**



वाकड परिसरात जीवे मारण्याची धमकी देऊन दहा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या घटनेतील पिडीत मुलीच्या कुटुंबियांची आठवले यांनी मंगळवारी भेट घेतली. पोलिसांकडूनही तपासाची माहिती घेतली. नगरसेवक राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर यावेळी उपस्थित होते. 'वाकडमधील घटनेतून माणूस कोणत्या थरापर्यंत जाऊ शकतो, हे दिसून आले आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार करण्यात आला आहे. या घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा झाली पाहिजे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. हा खटला जलद गती न्यायालयात चालविण्यात यावा. आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यादृष्टीने आरोपपत्र दाखल केले जावे. चार ते पाच महिन्यांमध्ये या प्रकरणाचा निकाल लागला पाहिजे. पोलिसांनी या प्रकरणाचा चांगल्या पद्धतीने तपास केला आहे', असे आठवले म्हणाले.

'सामाजिक न्याय खात्यातून या घटनेतील पिडीतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाईल. पक्षाच्या वतीनेही मदत केली आहे. गरीब, मजुरी करणारे कुटुंब आहे. अशा पद्धतीचे अत्याचार होऊ नये यासाठी समाजाने पुढे येण्याची आवश्यकता आहे. कायदे अनेक होतात. पण त्याची अंमलबजावणी होत नाही', अशी खंतही त्यांनी बोलून दाखविली.



वाकड येथील दहा वर्षीय चिमुकलीवरील अत्याचार प्रकरणाचा तपास अधिक वेगाने करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे. या पथकात पाच अधिकारी आणि पाच कर्मचाऱ्यांचा समावेश असून, सहायक पोलीस आयुक्त सुनील कुऱ्हाडे यांच्याकडे या तपासाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

या विशेष तपास पथकाच्या माध्यमातून गुन्ह्यातील सर्व पुरावे, साक्षी आणि तांत्रिक बाबींची सखोल पडताळणी करून तपास शक्य तितक्या कमी कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर लवकरात लवकर न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी पोलिसांकडून युद्धपातळीवर हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. दरम्यान, या प्रकरणातील आरोपीला न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, या कालावधीत एसआयटीकडून सखोल चौकशी केली जाणार आहे.

### कसा आला प्रकार उघडकीस

रमजान बन्नूसाब बागवान (वय ६५, रा. ताथवडे) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी ३० वर्षीय महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी बागवान हा गवंडी काम करतो. फिर्यादीच्या दहा वर्षीय मुलीला चाकूने पोट चिरेल, अशी धमकी देऊन घरात कोणी नसताना तोंड दाबून आरोपीने स्वतःच्या घरात नेले. त्यानंतर मे ते २७ जुलै २०२६ या कालावधीत तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच, फिर्यादीच्या चार वर्षीय मुलीला देखील त्याच कालावधीत एका प्रसंगी तोंड दाबून आरोपीने स्वतःच्या घरात नेल्याचा आरोप आहे. फिर्यादीच्या मुलीला आरोपी घेऊन जात असताना एका महिलेच्या निदर्शनास आले. संबंधित महिलेने याबाबत फिर्यादीला सांगितले. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. फिर्यादी महिलेने वाकड पोलिसांकडे धाव घेत या प्रकरणी तक्रार दिली.



## भूमिका

**केंद्र सरकारने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्यानंतर संसदेतील तणाव कमी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात विरोधक अधिक आक्रमक झाले असून पावसाळी अधिवेशनाचा तिसराही आठवडा गदारोळात जाण्याची चिन्हे दिसत आहेत.**

# अधिवेशन पाण्यात!



विद्यार्थ्यांवरील कथित पॅलेट गन वापराच्या आदेशाचा मुद्दा आणि नीट परीक्षा वादामुळे सरकारची कोंडी वाढली आहे. अधिवेशनाचा पहिला आठवडा प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीत गेला, तर दुसरा आठवडा पॅलेट गन प्रकरणावरून ठप्प झाला. परिणामी सरकारचा विधेयकांचा अजेंडा मागे पडला आहे. आयकर कायदा, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढविणे, जन्म-मृत्यू नोंदणी, राष्ट्रीय सन्मान, एमएसएमई, एफसीआरए दुरुस्ती आणि विकसित भारत शिक्षण प्रतिष्ठान यांसारखी महत्त्वाची विधेयके अजूनही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

याशिवाय मतदारसंघ पुनर्रचना विधेयक सरकारसाठी सर्वाधिक महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक असलेले दोन तृतियांश बहुमत मिळविणे सरकारसमोर मोठे आव्हान आहे. काही विरोधी पक्षांतील खासदारांनी सत्ताधारी आघाडीला पाठिंबा दिला असला तरी घटनादुरुस्तीच्या स्तरावरील बहुमत अद्याप अनिश्चित आहे. डीएमकेसारख्या पक्षांचा मुद्द्यांनुसार पाठिंबा मिळेल का, यावरही सरकारची रणनीती अवलंबून आहे.

दरम्यान, राम मंदिर वाद, महागाई, इथेनॉल धोरण, भ्रष्टाचार, परराष्ट्र धोरण आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारला सातत्याने घेरले आहे. या पार्श्वभूमीवर संसदेतील विधायक चर्चेपेक्षा राजकीय संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. लोकशाहीमध्ये सरकार आणि विरोधक यांच्यात मतभेद असणे स्वाभाविक असले तरी संसदेचे कामकाज पूर्णपणे ठप्प होणे ही चिंतेची बाब आहे.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर संसदेत भाजप खासदारांनी केलेले जल्लोषपूर्ण स्वागतही वादाचे कारण ठरले. एका गंभीर वादानंतर पद सोडलेल्या नेत्याचा गौरव करण्यामागील संदेश काय, असा प्रश्न विरोधकांनी उपस्थित केला. दुसरीकडे भाजपकडून हा पक्षाचा अंतर्गत सन्मान असल्याचे सांगितले जात असले तरी त्यातून जनमानसात कोणता संदेश जाईल, याबाबत पक्षातही चर्चा सुरू असल्याचे दिसते.

प्रधान यांच्या कार्यकाळात नवीन शैक्षणिक धोरण, पीएम-श्री शाळा आणि मातृभाषेतील शिक्षणासारखे महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात आले. मात्र, पेपरफुटी, एनटीएवरील प्रश्न, भरतीतील कथित अनियमितता आणि त्रिभाषा धोरणावरील वाद यांनी त्यांच्या कारकिर्दीवर सतत सावली टाकली. अखेरीस नीट प्रकरण हा निर्णायक टप्पा ठरला.

पावसाळी अधिवेशन हे सरकारसाठी विधायी कामकाज पूर्ण करण्याचे व्यासपीठ असते, तर विरोधकांसाठी सरकारला जाब विचारण्याची संधी. दोन्ही भूमिका लोकशाहीसाठी आवश्यक आहेत. मात्र, सातत्याने गदारोळ, घोषणाबाजी आणि कामकाज ठप्प राहिल्यास सर्वाधिक नुकसान संसदीय व्यवस्थेचे आणि जनतेच्या अपेक्षांचेच होते. उर्वरित अधिवेशनात राजकीय संघर्षाऐवजी विधायक चर्चा आणि महत्त्वाच्या विधेयकांवर निर्णय होणे, हीच लोकशाहीची खरी गरज आहे.

## प्रासंगिक »

### अतिरेक नको

**एकदा एक राजहंस एका बगळ्यास म्हणाला, 'काय रे तू आधाशी! पाण्यात-ला कोणताही प्राणी खायला तू मागेपुढे पहात नाहीस. बरं-वाईट, नासकं हा फर-कसुद्धा तुझ्या खादाड जिभेला समजत नाही.**

माझं पहा, मी फक्त पूर्ण उमलले-ल्या कमळातले तंतु तेवढे खाईन, दुसरा कसलाही पदार्थ माझ्या घशाखाली जाणार नाही.' त्यावर बगळा म्हणाला, 'माझ्या दृष्टीने असा चोखंदळपणा असणं बरं नव्हे. ज्या वेळी जे मिळेल ते खावं अन् सुखी राहावं. खाण्याचा पदार्थ दिसला की तो खावा हेच शहाणपणाचं. असे म्हणून बगळा उडाला व जवळच्या तलावाकाठी गेला.

तेथे कडेला एक मासा दिसला. तेव्हा विचार न करता त्याने तो एकदम गिळला, पण आत असलेला गळ घशाला लागून तो जिवास मुकला. राजहंस आपले आवडते खाणे दुसऱ्या कमळे असलेल्या तळ्यात गेला, पण तेथे हंस धरण्यासाठी जाळे लावले होते, त्यात तो सापडला.

-तात्पर्य:

**कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नको.**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला पश्चिम घाट हा जगातील सर्वाधिक जैवविविधता असलेल्या प्रदेशांपैकी एक मानला जातो. अनेक दुर्मिळ वनस्पती, प्राणी, पक्षी आणि असंख्य नद्यांचे उगमस्थान असलेल्या या परिसराचे पर्यावरणीय महत्त्व निर्विवाद आहे.

# पश्चिम घाटाची कोंडी कधी फुटणार?

मात्र, विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यातील संघर्षामुळे पश्चिम घाटाला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. आता केंद्र सरकारने सातव्यांदा मसुदा अधिसूचना जारी केली असून, तरीही यावरील कोंडी फुटणार का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

माधव गाडगीळ समितीने पश्चिम घाटाचा सखोल अभ्यास करून या परिसराला तीन संवेदनशील विभागांत विभागण्याची शिफारस केली होती. अत्यंत संवेदनशील भागात मोठ्या विकास प्रकल्पांवर बंदी, तर इतर भागांत नियंत्रित विकासाची भूमिका समितीने मांडली होती. मात्र, या शिफारशींमुळे शेती, उद्योग, घरबांधणी आणि स्थानिक रोजगारावर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त करत संबंधित राज्यांनी विरोध केला. त्यानंतर कस्तुरीरंगन समितीने संवेदनशील क्षेत्राची व्याप्ती कमी केली, तरी अंतिम निर्णय आजतागायत झालेला नाही.



दरम्यान, पश्चिम घाटात रस्ते, बोगदे, पूल, खाणकाम आणि विविध विकासकामांचा वेग सातत्याने वाढत आहे. विकास आवश्यक असला तरी पर्यावरणाची किंमत मोजून तो साधला जात असेल, तर त्याचे परिणाम भविष्यात अधिक गंभीर ठरू शकतात. अतिवृष्टी, भूस्खलन, दरडी कोसळणे, महापूर आणि नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये होणारे बदल ही त्याची स्पष्ट उदाहरणे आहेत. यंदाही कोकण आणि पश्चिम घाट परिसरात मुसळधार पावसामुळे अनेक घाटमार्ग बंद करावे लागले, तर अनेक गावांचा संपर्क तुटला.

पश्चिम घाटाच्या संरक्षणाचा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नाही, तर लाखो नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि जलस्रोतांच्या भवितव्याचाही आहे. अल्पकालीन आर्थिक हितासाठी नैसर्गिक संपत्तीचा अतिरेकाने वापर झाल्यास त्याची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागते. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणारी भूमिका स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

सातव्यांदा जारी झालेल्या मसुद्यावर पुढील ६० दिवसांत आक्षेप व सूचना मागविण्यात आल्या आहेत. यावेळी केंद्र आणि संबंधित राज्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून वैज्ञानिक दृष्टिकोनातून निर्णय घेणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे संरक्षण आणि स्थानिकांच्या विकासाच्या गरजा यांचा सुवर्णमध्य साधणारी अंतिम अधिसूचना आता अधिक विलंब न लावता जारी झाली, तरच पश्चिम घाटाचे नैसर्गिक वैभव आणि भावी पिढ्यांचे पर्यावरणीय भविष्य सुरक्षित राहू शकेल.

## ।। अभंगवाणी ।।



सावध जालों सावध जालों ।  
हरिच्या आलों जागरणा ॥१॥

तेथें वैष्णवांचे भार ।  
जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन

## शिक्षण, राजकारण आणि सहकार क्षेत्रातील दिग्गज हरपला

**महाईन्यूज । पुणे**

**पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंतराव तथा डॉ. डी. वाय. पाटील यांचे बुधवारी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. ते ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी आणि बिहार, त्रिपुरा व पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल होते. महाराष्ट्रामध्ये शिक्षणसम्राट ह्या उपाधीने ओळखल्या जाणाऱ्या डी. वाय.पाटील ह्यांना १९९१ साली पद्मश्री हा पुरस्कार देण्यात आला होता. त्यांचा जन्म २२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूरमधील अंबप गावात झाला होता. कोल्हापूरच्या मातीतले रांगडे व्यक्तिमत्त्व होते.**




भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य असलेले डी.वाय. पाटील १९५७ ते १९६२ दरम्यान कोल्हापूर शहराचे महापौर होते. १९६७ व १९७२ साली ते पन्हाळा विधानसभा मतदारसंघामधून विधानसभेवर निवडून आले होते. सर्वसामान्य कार्यकर्त्यांपासून सुरु केलेली राजकीय कारकीर्द पुढे अनेक मोठमोठ्या पदांपर्यंत घेऊन गेली. कार्यकर्ता, महापौर ते अगदी राज्याचे राज्यपाल, असा विस्मयचकित करणारा प्रवास डॉ. डी. वाय पाटील यांचा आहे.

भाजपप्रणित एनडीए सरकार केंद्रात सत्तेत आल्यानंतर अनेक राज्यातील राज्यपालांची उचलबांगडी करण्यात आली. त्यांच्या ठिकाणी नवे राज्यपाल नियुक्त करण्यात आले. मात्र, राजकारणाच्या पलिकडचे व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांचे राज्यपालपद कायम ठेवण्यात आले होते. तेव्हा डॉ. डी. वाय. पाटील हे बिहारचे राज्यपाल होते.

देश-विदेशात शिक्षण आणि वैद्यकीय संस्था, तसेच नवी मुंबईतील खेळाचे भव्य मैदान असो, ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले. तिथे ठोस कामगिरी करत आपल्या नावाचं ब्रँड तयार केले. डी.वाय. पाटील ह्यांच्या नावाच्या अनेक संस्था महाराष्ट्रात आहेत. त्यामध्ये पद्मश्री डी.वाय. पाटील विद्यापीठ, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठ, पुणे, आंबी या विद्यापीठांचा समावेश आहे.

शेकडो शिक्षण संस्थांचेव्यापक नेटवर्क असलेला व गुणवत्तेमुळेराज्यातच नव्हे, तर देशभरात ओळखला जाणारा डी. वाय. पाटील ग्रुप शैक्षणिक वटवृक्ष बनला आहे. ग्रुपच्या विविध संस्थांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेलेलाखो विद्यार्थी आज देश-विदेशांत उच्चपदावर कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला आकार देतानाच परंपरा जतन करून सुजाण नागरिक बनवण्यासाठी ग्रुपतर्फे नेहमीच प्रयत्न केला जातो.

‘जे कराल तेमनापासून करा. जिथे जाल तिथेसर्वोच्च बना,’ असा संदेश पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील नेहमी देत असतं.डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक महामेरू हरपला -कुलगुरू डॉ. राजनीश कामत

ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कामगिरी बजावणारे महामेरू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशी शोकभावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी व्यक्त केली त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे. डॉ. पाटील यांना चिरशांती लाभो, अशी भावनाही कुलगुरूंनी व्यक्त केली आहे.

# शिवसेना नेत्यांच्या भेटीवरून अभिजीत दिपकेंची भाजपावर टीका

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**

**शिवसेनेच्या (शिंदे) नेत्यांनी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक दिपकेंची भेट घेतल्यानंतर भाजपा आणि शिवसेनेत वाद निर्माण झाला आहे. या भेटीवरून आरोप-प्रत्यारोप होत असताना यावर दिपके यांनी भाष्य केले आहे. “३० वर्षांच्या मुलाला घाबरण्याची गरज नाही. शिवसेनेचे नेते केवळ शुभेच्छा देण्यासाठी आले होते. आमचे दुसरे काहीही बोलणे झाले नाही. युवकांचा, विद्यार्थ्यांचा मुद्दा उचलला याबद्दल त्यांनी अभिनंदन केले. यात भाजपाला घाबरण्याची काहीही गरज नाही. ईडी, सीबीआय वगैरे सर्व भाजपाकडे आहे, आमच्याकडे काहीही नाही”, अशी प्रतिक्रिया अभिजीत दिपके यांनी माध्यमांशी बोलताना दिली.**



छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलत असताना अभिजीत दिपकेंना विविध प्रश्न विचारण्यात आले. ज्यावर त्यांनी आपली भूमिका मांडली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते अतुल लिमये यांनी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यक्रमात बोलत असताना जंतर-मंतरवर झालेले आंदोलन देशविरोधी आणि लोकशाहीविरोधी असल्याचे म्हटले होते. याबाबत अभिजीत दिपके यांना प्रश्न विचारण्यात आला.

या प्रश्नावर अभिजीत दिपके म्हणाले, ज्या लोकांनी गांधींची हत्या केली, ज्या लोकांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध केला. त्या लोकांनी आम्हाला संविधानावर लेक्चर देऊ नये.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हे जेन-झी आणि जेन-अल्फा पिढीशी संवाद साधणार असून ६ ऑगस्ट रोजी याबाबतचा कार्यक्रम मुंबईत होत आहे. यावर प्रश्न विचारला असता अभिजीत दिपके म्हणाले की, उशीर का असेना पण संघाला तरुणांबरोबर संवाद साधावासा वाटत आहे. पण तरुणांनी तरुणांशी संवाद साधला तर योग्य होईल, असे माझे मत आहे. कारण जोपर्यंत तरुण आणि शिक्षित चेहरे पुढे आणले जात नाहीत, तोपर्यंत तरुणांपर्यंत पोहोचता येत नाही.

प्रशांत किशोर यांनी बांकीपूर पोटनिवडणुकीत भाजपाला पराभवाची धूळ चारल्याबद्दल अभिजीत दिपके यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. लोकशाहीत असेच असले पाहिजे. प्रशांत किशोर हे नव्या पिढीचे नेते आहेत. अशाच प्रकारे नव्या लोकांनी पुढे येणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## E20 आंदोलनाला आमचा पाठिंबा

आम आदमी पक्षाकडून आज ई२० इंधनाच्या विरोधात आंदोलन केले जात आहे. यावर बोलत असताना दिपके म्हणाले की, ई२० विरोधात अनेकजण बोलत आहेत. देशात हा मोठा मुद्दा बनला आहे. अनेकांनी हा मुद्दा उचलला आहे. आमच्याही पेजेसवर ई२० वर बोलण्याबाबत विचारले जात आहे. ई२० बाबत जी आंदोलने होतील, त्याला आमचा पाठिंबा आहे. हा कोणत्याही एका पक्षाचा मुद्दा नाही. यामुळे वाहन नादुरुस्त होत असल्याची तक्रार अनेकांनी केली आहे.

# पाकिस्तानला आणखी एक धक्का!

## बलुचिस्तानचा ११ ऑगस्टला 'स्वातंत्र्य दिन' साजरा करण्याचा दावा

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानपासून वेगळ्या देशाची घोषणा केल्यानंतर आता बलुचिस्तानने वेगळ्या स्वातंत्र्यदिनाची देखील घोषणा केली आहे. येत्या ११ ऑगस्ट रोजी बलुचिस्तान त्यांचा पहिला स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहे. काही दिवसांपूर्वीच बलुचिस्तान वेगळा देश असल्याचे एक पत्रक सोशल मीडियावर व्हायरल झालं होतं. यात बलुचिस्तानकडून स्वतंत्र राष्ट्रीय ध्वज, चलन, राष्ट्रगीताची घोषणा केली होती. जगाने देखील बलुचिस्तानला मान्यता द्यावी अशी विनंती व्हायरल पत्रकातून करण्यात आली होती.**



११ ऑगस्ट रोजी बलुचिस्तान स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचे आवाहन करणारे एक पत्रक आता सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले आहे. या पत्रकातून बलुच लोकांना हा दिवस उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले आहे. बलुच नेते मीर यार बलुच यांनी नागिरकांना राष्ट्रध्वज फडकवण्याचे आवाहन केले आहे. “संपूर्ण बलुच राष्ट्रातील लोकांनी आपापल्या घरांवर, वस्त्या, बाजारपेठा, दुकाने, शैक्षणिक संस्था आणि इतर सार्वजनिक ठिकाणी स्वतंत्र बलुचिस्तानचा राष्ट्रध्वज फडकवावा”, असे त्यांनी आवाहन केले आहे.

भविष्यातील पिढ्यांना यातून प्रेरणा मिळेल, असेही बलुच नेते मीर यार बलुच यांनी म्हटले आहे. हा दिवस ऐतिहासिक आणि अत्यंत महत्वाचे असल्याचे देखील बलुच यांनी म्हटले आहे. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या पत्रकानुसार, बलुचिस्तान ११ ऑगस्ट हा आपला स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करेल, दरवर्षी हा दिवस साजरा केला जाईल. पाकिस्तानच्या धोरणांचा केवळ या प्रदेशावरच नव्हे, तर जगाच्या इतर भागांवरही झाला आहे, असेही पुढे पत्रकात म्हटले आहे.

### ११ ऑगस्टच का?

स्वातंत्र्य दिनासाठी ११ ऑगस्टची निवड का करण्यात आली? याबाबत पत्रकात उल्लेख केल्याप्रमाणे, ब्रिटिशांना देश सोडण्याचा निर्णय घेतला तेव्हा बलुचिस्तानने ११ ऑगस्ट १९४७ रोजी प्रथम आपले स्वातंत्र्य घोषित केले. या घोषणेची बातमी ‘द न्यूयॉर्क टाइम्स’सह आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिली होती आणि ‘ऑल इंडिया रेडिओ’ने प्रसारित केली होती, असा दावा त्यांनी केला आहे. दरम्यान, १४ ऑगस्ट रोजी पाकिस्तानचा स्वातंत्र्य दिन असतो.

### पत्रकात काय दावा केलाय?

या पत्रकात काश्मीर, मार्च १९४८ मधील बलुचिस्तानमधील लष्करी कारवाई, पूर्व पाकिस्तानमधील १९७१ चा संघर्ष, जॉर्डनमधील पॅलेस्टिनींचा समावेश असलेल्या कारवाया, सोव्हिएत-अफगाण युद्ध, चगाई जिल्ह्यातील १९९८ च्या अणुचाचण्या आणि अमेरिकेतील ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतरच्या घडामोडींचा उल्लेख करण्यात आला आहे. यामुळे बलुचिस्तानमध्ये अशांतता, वाद, संघर्ष आणि रक्तपात झाल्याचा या पत्रकात म्हटले आहे. जगाने देखील बलुचिस्तानला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देण्याची मागणी या पत्रकातून करण्यात आली आहे.

## तमिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांची अटक आणि सुटका

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**तमिळनाडूचे माजी उपमुख्यमंत्री आणि विधानसभेचे विद्यमान विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांनी अभिनेत्री त्रिशाबद्दल वादग्रस्त टिप्पणी केल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तंजावर येथे कावेरी पाणी वाटपावरून सुरू असलेल्या आंदोलनात त्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी जाहीर सभेला संबोधित करत असताना त्यांनी वादग्रस्त विधान केले. या विधानावर आता भाजपा आणि मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षानेही जोरदार टीका केली आहे.**



### टीव्हीकेची टीका

उदयनिधी स्टॅलिन यांच्या विधानानंतर जोसेफ विजय यांचा ‘तमिळगा वेत्री कळगम’ (TVK) आणि द्रमुक पक्ष आमनेसामने आले आहेत. टीव्हीकेचे नेते अधव अर्जुन यांनी उदयनिधी यांना ‘अश्लिल निधी’ अशी उपमा देत राजकारणाचा स्तर घसरवला असल्याची टीका केली. तसेच आपल्या विधानातून महिलांचा अवमान करत असल्याचीही टीका त्यांनी केली. अण्णादुराई यांनी सुरू केलेली चळवळ उदयनिधी स्टॅलिन आपल्या अश्लिल आणि द्वय अर्थी विधानातून बदनाम करत आहेत, असाही आरोप अर्जुन यांनी केला. तसेच उदयनिधी यांच्या विधानातून महिलांबद्दलचा विकृत विचार दिसून येत आहे. तमिळनाडूमधील कोणतीही आई, बहीण आणि पालक सार्वजनिक जीवनात अशा भाषेला स्वीकारणार नाहीत, असेही ते म्हणाले.

गुन्हा दाखल झाल्यानंतर मंगळवारी तमिळनाडू पोलिसांनी उदयनिधी स्टॅलिन यांना ताब्यात घेतले आहे. त्यांना चौकशीसाठी चेन्नईहून तंजावर येथे नेले जाणार असल्याचे सांगितले जाते. स्टॅलिन यांनी अंतरिम जामीन मिळवण्यासाठी मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने त्यांचा जामीन मंजूर केला आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तंजावर पोलीस ठाण्यात उदयनिधी स्टॅलिन यांच्याविरोधात सहा कलमाअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कावेरी पाणी प्रश्नावर आंदोलनात बोलत असताना स्टॅलिन यांनी मुख्यमंत्री जोसेफ विजय यांच्यावर टीका केली होती. कावेरीतील तमिळनाडूच्या वाट्याचे पाणी मिळवून देण्यात अपयशी ठरल्याबद्दल जोसेफ विजय यांच्यावर आरोप होत आहेत.

उदयनिधी स्टॅलिन भाषण करत असताना उपस्थितांमधून त्रिशा, त्रिशा असा आवाज दिला गेला. यानंतर उदयनिधी स्टॅलिन यांनी काही क्षण थांबून द्वय अर्थी विधान केले. या विधानावर आता राजकीय वर्तुळातून टीका केली जात आहे. हे विधान अश्लिल आणि महिलांचा अवमान करणारे होते, असे सांगितले जात आहे.

टीव्हीकेप्रमाणेच भाजपानेही द्रमुकचे नेते उदयनिधी स्टॅलिन यांच्या विधानावर जोरदार आक्षेप घेतला. तमिळनाडूचे भाजपाचे मुख्य प्रवक्ते नारायण तिरुपती यांनी म्हटले की, उदयनिधी यांचे विधान अश्लील, अवमानकारक आणि सभ्य समाजाला शोभा देणारे नाही. त्यांना अटक करण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली.

# 'शूर्पणखा'च का निवडली?



रणबीर कपूरच्या बहुचर्चित 'रामायण' चित्रपटाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून सोशल मीडियावर त्यातील कलाकार, भव्य सेट आणि व्हिज्युअल इफेक्ट्सचे कौतुक होत आहे. भगवान रामाच्या भूमिकेत रणबीर कपूर, सीतेच्या भूमिकेत साई पल्लवी, तर रावणाच्या भूमिकेत यश झळकणार आहेत. मात्र, या सर्वांमध्ये अभिनेत्री रकुल प्रीत सिंहच्या शूर्पणखा या भूमिकेनेही प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. ट्रेलरमध्ये रकुलची झलक पाहिल्यानंतर अनेकांनी तिच्या अभिनयाचे आणि लूकचे कौतुक केले. दरम्यान, एका चाहत्याने रकुलला सोशल मीडियावर खुले पत्र लिहून तिने शूर्पणखासारखी भूमिका का स्वीकारली, असा प्रश्न विचारला.

# मलायका अरोराने खरेदी केली नवी कार

बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरा हिने स्वतःसाठी एक नवीन कार खरेदी केली आहे. मलायकाने पिवळ्या रंगाची महिंद्रा थार रॉक्स स्टार एडिशन कार घेतली आहे. या नव्याकोऱ्या कारची पूजा करताना मलायकाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मात्र यातील एक गोष्ट खटल्याने काही नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका केली आहे. या व्हिडीओत मलायका गाडीची पूजा करताना दिसत आहे. अभिनेत्रीने डीप नेक ड्रेस घातल्याचं दिसत आहे. मॉर्डन असूनही परंपरा जपत गाडीची पूजा केल्याने मलायकाने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. मात्र गाडीची पूजा करताना, हातात आरतीचं ताट असताना मलायकाच्या पायात चप्पल बघून नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केले आहे.



# आता सहन करणार नाही

बॉलिवूडमधील अनेक कलाकारांचे फोटो आणि व्हिडिओ वापरून डीपफेक कंटेंट तयार केला जात असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी अनेक कलाकारांनी आवाज उठवत थेट तक्रार दाखल केली आहे. अशीच घटना अभिनेत्री प्रीती झिंटासोबत घडली होती. गेल्या काही दिवसांपूर्वी या प्रकरणी अभिनेत्रीने दाखल केलेल्या तक्रारीची सुनावणी न्यायालयात पार पडली होती. यानंतर आता अभिनेत्री मृणाल ठाकूरने (Mrunal Thakur)आक्रमक पवित्रा घेत डीपफेक कंटेंट तयार करणाऱ्यांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. यासंदर्भात अभिनेत्रीने सोशल मीडियावरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टद्वारे तिने अशा प्रकारच्या गैरवापराविरोधात कठोर भूमिका घेतली असून भविष्यात तिच्या ओळखीचा गैरवापर झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. मृणालने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर केली ती म्हणाली, "तिची प्रतिमा किंवा आवाज वापरून डीपफेक व्हिडिओ किंवा फोटो तयार करणे आणि ते प्रसारित करणे बेकायदेशीर आहे. अशा प्रकारचे सर्व कंटेंट तात्काळ हटवावे. तसेच असा प्रकार समोर आल्यास कायदेशीर पावले उचलली जातील." असा थेट इशारा अभिनेत्रीने दिला आहे. दरम्यान, मृणाल ठाकूरच्या कामाबाबत बोलायचे झाल्यास, यावर्षीच्या सुरुवातीला ती सिद्धांत चतुर्वेदीसोबत 'दो दीवाने शहर में' या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात झळकली होती. मुंबईत राहणाऱ्या दोन तरुणांच्या प्रेम, आत्मविश्वास आणि सामाजिक दबावांशी सुरू असलेल्या संघर्षाची कथा या चित्रपटातून मांडण्यात आली होती. चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. यानंतर मृणाल डेव्हिड धवन दिग्दर्शित 'है जवानी तो इश्क होना है' या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटात दिसली. या चित्रपटात वरुण धवन आणि पूजा हेगडे यांच्याही प्रमुख भूमिका होत्या. तसेच, शनील देव दिग्दर्शित 'डकैत – एक प्रेम कथा' या ॲक्शन-ड्रामा चित्रपटात मृणालने आदिवी शेषसोबत काम केले आहे. आता तिच्या आगामी चित्रपटाविषयी चाहत्यांना उत्सुकता निर्माण झाली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे डीपफेक व्हिडिओ आणि फोटो तयार करण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे कलाकारांसह सर्वसामान्य नागरिकांच्या गोपनीयतेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा बनावट सामग्रीमुळे व्यक्तीची प्रतिमा मलिन होण्याबरोबरच दिशाभूल करणारी माहितीही वेगाने पसरू शकते. त्यामुळे सायबर तज्ज्ञांकडून सोशल मीडियावरील कोणतीही संशयास्पद सामग्री पडताळून पाहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मृणाल ठाकूरच्या या भूमिकेचे अनेक चाहत्यांनी आणि नेटिझन्सनी समर्थन केले असून, अशा गैरप्रकारांविरोधात कठोर कारवाईची मागणीही केली आहे. दरम्यान, डीपफेकविरोधात कठोर कायदे आणि प्रभावी अंमलबजावणीची गरज असल्याची चर्चाही पुन्हा एकदा सुरू झाली आहे.



# अवघ्या ४० चेंडूंत ठोकले द्विशतक!

## अभिषेक शर्माचा श्रीलंका दौऱ्यापूर्वी धुमधडाका; १५ चौकार अन् २५ गगनचुंबी षटकार

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**झिम्बाब्वे दौऱ्यावर फलंदाजीत पूर्णपणे अपयशी ठरलेल्या भारताचा युवा फलंदाज अभिषेक शर्माने (Abhishek Sharma) आपल्या टीकाकारांना सडेतोड उत्तर देत जोरदार कमबॅक केले आहे. आगामी श्रीलंका दौऱ्यापूर्वी पंजाबमध्ये खेळल्या गेलेल्या एका सामन्यात त्याने ऐतिहासिक आणि वादळी खेळी साकारली. षटकारांचा पाऊस पाडत अभिषेकने अवघ्या ४० चेंडूंत तडाखेबंद द्विशतक झळकावण्याची किमया केली आहे. त्याच्या या तुफानी खेळीचे क्रीडा जगतातून प्रचंड कौतुक होत आहे.**




२ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या या सामन्यात अभिषेकने मैदानावर चौफेर फटकेबाजी केली. आपल्या खेळीदरम्यान त्याने १५ चौकार आणि २५ उत्तुंग षटकार खेचत अवघ्या ९१ चेंडूंत २३३ धावांची अतिमानवी खेळी साकारली. त्याच्या या ऐतिहासिक शतकाच्या जोरावर अमृतसर संघाने निर्धारित ५० षटकांत ८ गडी गमावून ५३३ धावांचा महाकाय डोंगर उभारला.

या महाकाय आव्हानाचा पाठलाग करताना तरनतारनचा संघ ३१३ धावांपर्यंतच मजल मारू शकला आणि अमृतसरने २२० धावांच्या भक्कम फरकाने सामना आपल्या नावे केला. तरनतारनकडून अर्शदीप सिंगने १०८ धावांची झुंज देणारी खेळी करत संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र अभिषेक शर्मानेच त्याची महत्त्वपूर्ण विकेट घेत तरनतारनच्या उरल्यासुरल्या आशांवर पाणी फेरले.

मागील काही काळापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अभिषेक शर्माची बॅट शांत होती. इंग्लंड दौऱ्यानंतर झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेतही त्याला मोठी धावसंख्या उभारता आली नव्हती. झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांत त्याला अवघ्या ११ धावा करता आल्या होत्या, तर त्याआधी इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत त्याने २६.२ च्या सरासरीने १३१ धावा केल्या होत्या. आपल्या शेवटच्या १० आंतरराष्ट्रीय टी-२० पार्यांमध्ये त्याला केवळ एकच अर्धशतक झळकावता आले होते.

सातत्याने खराब कामगिरी होत असल्याने त्याच्यावर चौफेर टीका होत होती. मात्र, या द्विशतकी धमाक्याने त्याने पुन्हा एकदा निवड समितीचे आणि क्रीडारसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या विक्रमी खेळीमुळे अभिषेक शर्माने आपल्या फॉर्ममध्ये दमदार पुनरागमन केल्याचे संकेत दिले असून, आगामी आंतरराष्ट्रीय मालिकांसाठी त्याचा दावा अधिक भक्कम झाला आहे.

### धावांचा पाऊस

पंजाबमध्ये सुरू असलेल्या 'पंजाब आंतर-जिल्हा सीनियर स्पर्धा २०२६-२०२७' मध्ये रविवारी अमृतसर संघाकडून खेळताना अभिषेक शर्माने तरनतारन संघाविरुद्ध फलंदाजीत कहर माजवला. अमृतसरच्या मैदानावर त्याच्या आक्रमक फटकेबाजीसमोर प्रतिस्पर्धी गोलंदाज पार हतबल झालेले पाहायला मिळाले. २५६.०४ च्या अत्यंत स्फोटक स्ट्राइक रेटने धावा कुटत त्याने हे तडाखेबंद द्विशतक पूर्ण केले. या दमदार कामगिरीच्या जोरावर त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंग्लंड आणि झिम्बाब्वे दौऱ्यातील अपयशाची गडद सावली दूर सारत आपण पूर्ण फॉर्मात असल्याचे सिद्ध केले आहे.

# ब्रूकला सोडून रूटला कसोटी कर्णधार करणं स्टोक्सला का रूचत नाहीये?

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**इंग्लंडचा माजी कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने इंग्लंडच्या कसोटी संघाचे कर्णधारपद हॅरी ब्रुकला न मिळाल्यामुळं आश्चर्य व्यक्त केले आहे. हॅरी ब्रूक हा इंग्लंडचा टी २० आणि वनडे संघाचा कर्णधार आहे. तसेच तो कसोटी संघाचा उपकर्णधार देखील आहे.**




### जो रूटची एक अडचण

स्टोक्सने सांगितलं की, मी जो रूटच्या यशासाठी प्रार्थना करतो. मला आशा आहे की तो पुढं येऊन कर्णधार म्हणून मोठं यश मिळवले. मला वाटते की त्याला फ्लेमिंगसोबत काम करताना मजा येईल. तो एक चांगला व्यक्ती आहे. मी फ्लेमिंगसोबत काम केलं आहे. मात्र रूटला मी सांगितलं की माझी एकच चिंता आहे. ती चिंता म्हणजे तू आहेस. मला माहिती आहे की तू कोणत्या परिस्थितीतून गेला आहेस. तू कायमच टीमला पुढे ठेवतोस. ज्यावेळी तो इंग्लंडचा कर्णधार होता त्यावेळी त्याला कठिण परिस्थितीतून जावं लागलं होतं. परत असं व्हावं असं मला वाटत नाही. मी त्याच्या मोठ्या यशाची कामना करतो. मला खात्री आहे की तो चांगली कामगिरी करेल.

बेन स्टोक्सने जून २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर स्टोक्सने त्याच्या जागी ब्रूकला कर्णधार करण्यात यावं या मागणीचे समर्थन केले होते. तो दीर्घ काळापासून कसोटी संघाचा उपकर्णधार आहे.

मात्र निवडसमितीने स्टोक्सचा सल्ला ऐकला नाही अन् त्यांनी जो रूटच्या गळ्यात कसोटी कर्णधारपदाची माळ टाकली. जो रूट पहिल्यांदाच कर्णधार झालेला नाही. तो स्टोक्सला कर्णधारपद देण्यापूर्वी संघाचे नेतृत्व करत होता. रूटच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने २०१७ ते २२ या काळात ६५ कसोटी सामने खेळले असून त्यातील २७ सामन्यात विजय मिळवला होता.

स्टोक्सने लव्ह ऑफ क्रिकेट या पॉडकास्टमध्ये सांगितलं की, 'माझ्या मते जर तुम्हाला वाटत असेल की चांगला कर्णधार चांगला लीडर होईल तर त्याला जबाबदारी दिली पाहिजे. मी निवडसमितीचा तर्क समजू शकतो. मात्र तरी देखील माझ्या मानत एक प्रश्न आहे की यामुळं ब्रूकला काय मेसेज जाणार आहे. तो संघाचा उपकर्णधार आहे. मात्र कर्णधार नाहीये तरी त्याला संघाची धुरा दिली जात नाहीये.'

नुकतेच इंग्लंडने न्यूझीलंडचा माजी कर्णधार स्टीफन फ्लेमिंगला कसोटी संघाचा मुख्य प्रशिक्षक केलं आहे. फ्लेमिंगने ब्रँडन मॅक्युलमचे जागा घेतली. मॅक्युलम आता वनडे आणि टी २० संघाचा प्रशिक्षक असणार आहे. फ्लेमिंगने चेन्नईसाठी आयपीएलमध्ये रेकॉर्ड ५ ट्रॉफी जिंकल्या आहेत. स्टोक्स देखील सीएसकेचा भाग राहिला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
दि. 05 ऑगस्ट 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

## BA LIBERAL ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.

- **GLOBAL PERSPECTIVE** Understand the world.
- **CRITICAL THINKING** Question. Analyze. Evolve.
- **COMMUNICATION** Express ideas with impact.
- **INTERDISCIPLINARY LEARNING** Connect concepts. Create solutions.
- **DIVERSE CAREER PATHS** Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# पवना जलवाहिनी प्रकल्पाला नवी दिशा

## 13 जखमी शेतकऱ्यांच्या नोकरीच्या प्रस्तावामुळे हालचालींना वेग; फेरप्रस्ताव शासनाकडे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प तब्बल 15 वर्षांपासून ठप्प आहे. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांवर झालेल्या गोळीबारात तीन जणांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्यापैकी जखमींना महापालिकेत नोकरी देण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे. तो फेरप्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे. त्यांना नोकरी मिळाल्यास पवना जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागू शकतो, असा विश्वास महापालिका प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.**



पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी पुणे-मुंबई एक्सप्रेस वेवर बऊर टोलनाका येथे 9 ऑगस्ट 2011 ला रास्ता रोको आंदोलन केले होते. आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी गोळीबार केल्याने तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तर, 13 जण जखमी झाले. त्या दिवसापासून तो प्रकल्प अपूर्ण स्थितीत बंद आहे. भारतीय किसान संघाने या प्रकल्पाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका फेटाळण्यात आली होती. त्या निर्णयाविरोधात भारतीय किसान संघाने 27 जानेवारी 2010 ला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे (एमडब्ल्यूआरआरए) अपिल केले होते. प्राधिकरणाने 16 मे 2022 ला दिलेल्या आदेशानुसार महापालिकेने पवना नदीवर गहुंजे व शिवणे येथे कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधून दिला आहे. तसेच, आंदोलनात मृत्यू झालेल्या तीन शेतकऱ्यांच्या वारसांना महापालिकेत कायमस्वरूपी नोकरी दिली आहे.

दरम्यान, त्या प्रकल्पावरील स्थगिती राज्य सरकारने 8 सप्टेंबर 2023 ला उठवल्याने प्रकल्पातील मुख्य अडसर दूर झाला आहे. महापालिकेने प्रकल्पाचा सुधारित डीपीआर तयार केला आहे. त्यानुसार, हा 400 कोटी रुपयांचा प्रकल्प 1 हजार 200 कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहचला आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत नुकतीच बैठक झाली. त्यात शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते.

त्यानुसार, मावळ तालुक्यातील शेतकरी प्रतिनिधी, आंदोलक, धरणग्रस्त व लोकप्रतिनिधींसोबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात 13 जुलैला बैठक झाली. त्यात शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. विविध मागण्यांसोबत आंदोलनात जखमी झालेल्यांना महापालिकेत नोकरी देण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. आंदोलनात मोरेश्वर साठे, कांताबाई ठाकर व शामराम तुपे यांचा मृत्यू झाला. तर, योगेश तुपे, शिवाजी बर्वे, अमित दळवी, विशाल राऊत, अजित चौधरी, नवनाथ गराडे, गणेश तरस, तुकाराम दळवी, मारुती खिरीड, काळूराम राऊत, दत्तात्रय पवार, सुरेखा कुडे व नीलेश कुडे हे जखमी झाले होते. मृत्यू झालेल्यांच्या वारसांना नोकरी देण्यात आली. मात्र, जखमींना नोकरी देण्याबाबत महापालिकेचा प्रस्ताव राज्य शासनाने फेटाळला होता. शासन नियमात तो प्रस्ताव बसत नसल्याने जखमींना नोकरी देण्यास नकार दिला गेला.

जखमींना किंवा त्यांच्या वारसांना महापालिकेत नोकरी देण्याचा मुद्दा मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीत मांडण्यात आला होता. त्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी आयुक्तांना दिले होते. त्यानुसार, त्यासंदर्भातील फेरप्रस्ताव राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्या 13 जणांना महापालिकेत नोकरी दिली जाणार आहे.

### प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाबाबत मुंबई येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार रास्ता रोको आंदोलनातील 13 जखमींना नोकरी देण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. तो मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले.

---

# सायबर फसवणुकीपासून सावध राहा; देशात दररोज १०० कोटींची डिजिटल लूट

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**दिवसेंदिवस वाढणारे सायबर गुन्हे, अमली पदार्थांचे जाळे आणि भीती दाखवून केली जाणारी डिजिटल अरेस्ट यासारख्या गंभीर प्रकारांपासून नागरिक व विद्यार्थ्यांनी सतर्क राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन खंडाळा ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर अरगडे यांनी केले.**




### ओटीपी कोणालाही देवू नका

लोणावळा एज्युकेशन ट्रस्टच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित विशेष प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी त्यांनी विद्यार्थी, शिक्षक आणि परिसरातील पोलिस पाटलांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक सागर अरगडे यांनी सायबर भामट्यांच्या विविध क्लृप्त्यांची सविस्तर माहिती दिली. भामटे नेमकी कशी फसवणूक करतात, हे सांगताना त्यांनी सांगितले, की जास्त परताव्याचे किंवा व्याजाचे आमिष दाखवणे, लोकांचा विश्वास संपादन करून नंतर भीती दाखवून पैशांची मागणी केली जाते.

देशात सायबर गुन्ह्यांद्वारे दररोज सुमारे १०० कोटी रुपयांची नागरिकांची फसवणूक होत आहे. याशिवाय महाविद्यालयीन परिसरात होणारे रॅगिंग आणि त्यातून होणारी मानसिक पिळवणूक यांवरही विद्यार्थ्यांनी वेळीच आवाज उठवला पाहिजे, असे पोलिस निरीक्षक सागर अरगडे यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. नरेंद्र देशमुख यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाच्या काळजीबद्दल मोलाचा सल्ला दिला.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विलास पाटील, पोलिस पाटील संघटना प्रमुख संजय जाधव, परीक्षा विभागप्रमुख डॉ. राजेंद्र देवरे



यांच्यासह लोणावळा व कार्ला परिसरातील ग्रामीण भागातील पोलिस पाटील, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. पराग कुलकर्णी यांनी केले, तर प्रा. धनराज पाटील यांनी आभार मानले.

तसेच, फोनवर बोलून ओटीपी मागणे, बनावट यूपीआय आणि क्यूआर कोडद्वारे पैसे उकळणे, अनधिकृत किंवा चुकीच्या लिंक पाठवून डेटा हॅक केला जातो. फ्री जॉब ऑफर किंवा घरबसल्या कमाईच्या नावाखाली जाळ्यात ओढणे, डिजिटल अरेस्टची भीती दाखवून तसेच सेक्सटॉर्शनच्या माध्यमातून ब्लॅकमेल करून पैसे उकळण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत.

# लोणावळ्यात वाहतूक कोंडीचा विळखा

## ५ मिनिटांच्या अंतरासाठी लागताहेत तब्बल एक तास; मावळा पुतळा चौक बनला कोंडीचा अड्डा

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**शहरातील मावळा पुतळा चौक मागील काही दिवसांपासून वाहतूक कोंडीचा अड्डा बनला आहे. या ठिकाणी तीनही बाजूने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्यामुळे स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. पाच ते दहा मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी नागरिकांना पाऊण ते एक तासाचा कालावधी लागत आहे. लोणावळा शहरामध्ये वाहने उभी करण्यासाठी कोठेही जागा उपलब्ध नाही.**



या कोंडीवर नियंत्रण ठेवण्याचे कोणतेही धोरण पोलिस प्रशासन व नगर परिषदेने अंमलात आणलेले नाही. दिवसेंदिवस या ठिकाणी होत असलेली कोंडी हे सर्वसामान्य नागरिकांसाठी अक्षरशः डोकेदुखी ठरू लागली आहे. शाळेतील मुलांना घेण्यासाठी व त्यांना शाळेमध्ये सोडण्यासाठी येणाऱ्या पालकांना व स्कूल व्हॅन चालकांना या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक सामना करावा लागत आहे.

शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी कोणतीही दीर्घकालीन उपाययोजना लोणावळा नगर परिषदेने व शहर पोलिसांनी तयार केलेली नाही. शहरातील अरुंद रस्ते, जागा मिळेल त्या ठिकाणी वाहने उभी करण्याची अंगवळणी पडलेली सवय, आम्ही स्थानिक आहोत या आविर्भावात दुकानांसमोर वाहने उभी केली जात आहेत. याचेच अनुकरण आता शहरात येणारे पर्यटकदेखील करू लागले आहेत. नगर परिषदेमधील सत्ताधाऱ्यांना वाहतूक कोंडीचे सोयीर सुतकदेखील नाही. स्थानिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होवो अथवा न होवो आम्ही मात्र केवळ ठराव करण्यापुरतेच नगरसेवक आहोत, या व्यतिरिक्त आम्ही दुसरे काही करू शकत नाही, अशीच काहीशी परिस्थिती नगर परिषदेत पहायला मिळत आहे. सामाजिक कार्यकर्ते मात्र सोशल मीडियावर घसा कोरडा होईपर्यंत ओरडत आहेत. मात्र, त्यांचा आवाजदेखील प्रशासनापर्यंत पोहोचत नसल्याचे या निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीवरून स्पष्टपणे जाणवत आहे.

लोणावळा शहरामध्ये वाहनांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या, रस्त्यावर झालेली अतिक्रमणे, हॉटेल व दुकान व्यावसायिकांचे रस्त्यावरच लावण्यात आलेले लोखंडी बोर्ड व जागा मिळेल त्या ठिकाणी होत असलेले रिक्षा व टुरिस्ट वाहनांचे स्टॅन्ड यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालणे मुश्किल बनले आहे. लोणावळा शहरामध्ये वाहने उभी करण्यासाठी कोठेही जागा उपलब्ध नाही. मात्र, आता रस्त्यावरून वाहने चालवणेदेखील डोकेदुखी ठरू लागले आहे. अवघ्या पाच ते दहा मिनिटांच्या अंतरासाठी नागरिकांना किमान पाऊण ते एक तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मागील महिनाभरापासून शहरामध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे अनेक नागरिक आपल्या चारचाकी वाहनांमधून बाजारात जाण्याचा प्रयत्न करतात. मात्र, वाहतूक कोंडीने अक्षरक्षः त्यांचे कंबरडे मोडले आहे. आठवड्याचे सातही दिवस बाजारपेठेमध्ये वाहतूक कोंडी होऊ लागली आहे.

### वाहतूक नियंत्रणासाठी बारा वॉर्डन

लोणावळा नगर परिषदेने वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांना मदतनीस म्हणून बारा वॉर्डन दिले आहेत. यापैकी निम्म्यापेक्षा जास्त वॉर्डन हे मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावरच काम करण्यात समाधान मानत आहेत. मुख्य बाजारपेठेमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ना कोणी वॉर्डन उपलब्ध असतात ना पोलिस कर्मचारी. शहर पोलिस ठाण्याच्या निरीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन पाटील यांनी शहरातील वाहतुकीच्या समस्येला प्राधान्य क्रमाने सोडवणार असल्याचे म्हटले होते. प्रत्यक्षात मात्र असे काही होताना दिसत नाही.

# पिंपरी-चिंचवडमध्ये १० लाख वाहने एचएसआरपीविना; आरटीओची कारवाई

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

**केंद्र व राज्य शासनाने वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य केले आहे. सर्व वाहनधारकांना बसविण्यास गैरसुविधा होऊ नये, म्हणून शासनाकडून चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. तरीदेखील शहरात सुमारे दहा लाख वाहने विना एचएसआरपी रस्त्यावरून धावत आहेत.**




त्यामुळे नंबरप्लेट न बदलणाऱ्या वाहनांवर पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओने ) कारवाई सुरू केली आहे. परिवहन विभागाने राज्यातील एक एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी बसवणे बंधनकारक केले आहे. तर, एक जानेवारी २०२५ पासून या नव्या नंबरप्लेट बसविण्याची सुविधा सुरू करण्यात आली.

वारंवार मुदतवाढ देऊनही एचएसआरपीला मिळणारा अल्प प्रतिसाद लक्षात घेता परिवहन विभागाने १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांचे हस्तांतरण, नोंदणी, प्रमाणपत्रामध्ये पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना - हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे, आदी वाहनाविषयक सर्व कामकाज एचएसआरपी बसविल्याशिवाय १६ जून २०२५ पासून करण्यास मनाई केली होती. त्यानंतरही वाहनधारकांनी एचएसआरपी बसविण्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले.

पिंपरी-चिंचवड आरटीओमध्ये एकून २५ लाख वाहनांची नोंद आहे. यामध्ये १५ लाख ३९ हजार वाहने २०१९ पूर्वीची आहेत. यापैकी केवळ सात लाख वाहनधारकांची एचएसआरपीसाठी नोंद केली होती. यातील सुमारे पाच लाख ४७ हजार ३१४ वाहनांवर एचएसआरपी नंबरप्लेट बसवण्यात आल्या आहेत, तर सुमारे दहा लाख वाहनांवर अद्याप एचएसआरपी बसवलेल्या नाहीत. एचएसआरपी नंबर प्लेट नसल्यास पहिल्यांदा एक हजार रुपये दंड. दुसऱ्यावेळी या नियमाचे उल्लंघन केल्यास पाच ते दहा हजार रुपयापर्यंत दंड भरावा लागतो.

> एचएसआरपी नंबर प्लेटसाठी वारंवार मुदत वाढ देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात होते. पहिल्यांदा १५ ऑगस्ट २०२५ , त्यानंतर ३० नोव्हेंबर २०२५, तिसऱ्यांदा ३१ डिसेंबर २०२५ आणि ३० जून २०२६ पर्यंत अशी चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही अनेक वाहनधारकांनी नवीन नंबरप्लेट बसविण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे आता योग्य ती कारवाई केली जाणार आहे.
>
> **- राहुल जाधव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड.**

# एचसीएमटीआरला नवी दिशा

## पुणे-पिंपरीची वाहतूक कोंडी फोडणार; खासगी वाहनांसह इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमला प्राधान्य

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पुणे शहरातील उच्च क्षमता द्रुतगती मार्ग-एचसीएमटीआर म्हणजेच अंतर्गत वर्तुळाकार रस्त्यावर खासगी वाहनांच्या लेनबरोबरच इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम (ई-आरटीएस) सेवाही देण्यात येणार आहे. तसेच पुण्याच्या एचसीएमटीआर मार्गाला पिंपरी महापालिकेचा मार्गही जोडण्यात येणार असल्याने या जुळ्या शहरातील वाहतुकीची समस्या किमान निम्म्याने सुटणार आहे. त्यामुळे मुळात केवळ सार्वजनिक वाहतुकीसाठी राखीव असलेल्या एचसीएमटीआर प्रकल्पाचा हेतू सफल होण्याची सुचिन्हे दिसू लागली आहेत.**



एचसीएमटीआर ही संकल्पना केवळ सार्वजनिक वाहतुकीसाठीच मांडण्यात आली असताना तिला हरताळ फासून त्या योजनेत प्राधान्याने खासगी वाहनांच्या लेन घुसवण्याचा प्रकार पुणे महापालिकेने केला होता आणि बीआरटी म्हणजे सार्वजनिक वाहतुकीसाठी केवळ नावालाच एक लेन ठेवण्यात आली होती. त्यामुळे या योजनेचा मूळ उद्देशच धोक्यात आला होता. हा विषय 'पुढारी'ने प्रदीर्घ काळ लावून धरला होता. तथापि, त्याकडे दुर्लक्ष करीत खासगी वाहनांच्या रेट्याला प्रशासन बळी पडत होते. त्यातच केवळ सल्लागाराकडून आराखडा तयार करण्यापलिकडे या प्रकल्पाची मजल गेली नव्हती आणि तो प्रदीर्घ काळ रखडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या महिन्यात एचसीएमटीआरसह अन्य दोन प्रकल्पांना चालना देण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय केला आणि त्यामुळे आता त्या प्रकल्पाला चालना मिळाली आहे.

एचसीएमटीआर प्रकल्पाच्या पुनर्आखणीमध्ये इलेक्ट्रिक रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमचा (ई-आरटीएस) समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या समितीने केला असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी 'पुढारी'शी बोलताना दिली. या यंत्रणेत खासगी वाहनांसाठी लेन ठेवण्यात येणार आहेच. परंतु, त्या लेनलगतच ई-आरटीएससाठी उड्डाणपूलही उभारण्यात येणार आहे. ईआरटीएस म्हणजे इलेक्ट्रिकवर धावणाऱ्या बसगाड्या. त्यामुळे एचसीएमटीआरमध्ये सक्षम सार्वजनिक वाहतूक यंत्रणा पुणेकरांना मिळणार आहे. परिणामी पुण्याच्या कोणत्याही भागातून दुसऱ्या कोणत्याही भागात सार्वजनिक वाहतुकीने पोहोचण्याची सोय उपलब्ध होणार आहे. त्याला मेट्रोच्या सध्याच्या आणि भविष्यातील मार्गांची जोड मिळाल्याने पुण्यातील वाहतुकीची समस्या आटोक्यात येईल.

### एचसीएमटीआर म्हणजे काय ?

हाय कपॅसिटी मास ट्रान्झिट रूट म्हणजे उच्च क्षमता द्रुतगती मार्ग ही योजना महापालिकेच्या १९८७ च्या विकास आराखड्यात समाविष्ट करण्यात आली होती. नावाप्रमाणेच उच्च क्षमता म्हणजेच एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहून नेणारा प्रकल्प यात अभिप्रेत होता. त्यासाठी सार्वजनिक वाहतूक यंत्रणाच उभारण्यात येईल, हे गृहित धरण्यात आले होते. शहराच्या कोणत्याही टोकाला राहणाऱ्या नागरिकाने स्वतः आपल्या भागातून जाणाऱ्या या मार्गापर्यंतच जायचे असून, तेथून त्याला शहराच्या इतर कोणत्याही भागात सार्वजनिक वाहतुकीद्वारे पोहोचता येणार आहे.

# ‘एक जिल्हा-एक दस्त’ उपक्रमाला कार्यालयीन अडथळे; नागरिक त्रस्त

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राज्य शासनाकडून एक जिल्हा-एक दस्त उपक्रम राबविला जात आहे; मात्र जिल्ह्यातील विविध दुय्यम निबंधक कार्यालयांत दस्त नोंदणी करताना एकसमान कार्यपद्धती अवलंबली जात नसल्याने मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिक, वकील आणि पक्षकारांचे म्हणणे आहे.**



### एक जिल्हा-एक नोंदणी उपक्रम

नोंदणी अधिनियम व त्याअंतर्गत लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींमध्ये स्पष्टपणे नमूद नसलेल्या कारणांच्या आधारे नोंदणीयोग्य दस्त नाकारण्यात येऊ नयेत, असे दस्त नोंदणी करणाऱ्या नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाने राबविलेल्या “एक जिल्हा-एक नोंदणी” या उपक्रमाचा उद्देश नागरिकांना सोयीची, सुलभ आणि पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, प्रत्यक्षात प्रत्येक कार्यालयामध्ये वेगवेगळे निकष लावले जात असल्यामुळे या उपक्रमाचा अपेक्षित लाभ नागरिकांना मिळत नाही. या समस्येमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या अनेक नागरिकांचे व्यवहार रखडतात.

दस्त नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन आणि सुलभ असल्याचा दावा राज्य शासनाकडून केला जात असला तरीही पिंपरी-चिंचवड परिसरातील प्रत्येक कार्यालयाची पद्धत वेगळी असल्याने एका दस्तासाठी ३ ते ४ वेळा चकरा मारण्याची वेळ येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामध्ये वकिलांचा वेळ व श्रम वाया जातो. पक्षकारांचा त्यांच्यावरील विश्वास कमी होण्याची शक्यता निर्माण होते आणि विनाकारण गैरसमज व तणावाला सामोरे जावे लागते.

एकाच स्वरूपाचा दस्त एखाद्या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये नोंदविला जातो; परंतु त्याच प्रकारच्या दस्ताची नोंदणी दुसऱ्या कार्यालयामध्ये विविध कारणे सांगून नाकारली जाते. परिणामी पक्षकारांना दस्त नोंदणीसाठी दूरच्या कार्यालयात जावे लागते किंवा न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात दाद मागावी लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ व पैसा खर्च होऊन त्यांना विनाकारण न्यायालयाच्या आणि शासकीय कार्यालयांच्या चकरा माराव्या लागतात. कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करून, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून आणि पक्षकारांना योग्य सल्ला देऊनही प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयात वेगवेगळे निकष लावले जात असल्याने वकिलांना संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार स्पष्टीकरण द्यावे लागते. वकिलांनी कायद्यानुसार दस्त नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करूनही संबंधित कार्यालयाकडून स्पष्ट कायदेशीर कारण न देता दस्त नाकारला गेल्यास, त्यांना पक्षकारांच्या वतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अर्ज, अपील किंवा न्यायालयीन कार्यवाही करावी लागते.